# भारतीय रिझर्व बँक

**रिझर्व बँक ऑफ इंडीया**

**www.rbi.org.in**

**आरबीआय/२०१२-१३/२**
**महापरिपत्रक क्र. २/२०१२-१३** जुलै ०२, २०१२

प्रति,

वर्ग - १ प्राधिकृत डीलर बँक आणि प्राधिकृत बँक

महोदय /महोदया,

**अनिवासी सर्वसाधारण (एनआरओ) रुपये खात्यावरील महापरिपत्रक**

प्राधिकृत डीलर/प्राधिकृत बँकांद्वारे, भारताबाहेर रहिवासी असलेल्या व्यक्तीकडून ठेवी स्वीकारणे हे फेमा अधिसूचना क्र.५/२००० आरबी दिनांक मे ३, २००० सह, (वेळोवेळी सुधारित) वाचित, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ च्या कलम ६ च्या उपकलम (१) व (२) च्या तरतुदींनी नियंत्रित केले जाते.

२. ह्या महापरिपत्रकात **अनिवासी सर्वसाधारण रुपये (एनआरओ) खात्या**वरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी देण्यात आल्या आहेत. ह्या महापरिपत्रकामधील परिपत्रके/आधिसूचनांची यादी परिशिष्टामध्ये देण्यात आली आहे.

३. हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सनसेट क्लॉजने देण्यात येत आहे. हे महापरिपत्रक जुलै १, २०१३ रोजी मागे घेतले जाऊन त्या जागी अद्यावत केलेले महापरिपत्रक येईल.

आपला,

**(रुद्र नारायण कार)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

## अनुक्रमणिका

१.व्याख्या ........................................................................................................ २
२.पात्रता..............................................................................................................२
३. खात्याचे प्रकार..................................................................................................२
४. निवासी/अनिवासींसह संयुक्त खाती...........................................................................२
५.परवानगीप्राप्त क्रेडिट्स/डेबिट्स...............................................................................२-३
६. ॲसेट्सचे प्रेषण....................................................................................................३
७. भारताला भेट देणारे, भारतीय वंशाचे नसलेले विदेशी राष्ट्रीयत्वाचे लोक ..............................४
८.खातेदार व तृतीय पक्षांना प्राधिकृत बँकेद्वारे कर्जे/ओव्हरड्राफ्ट दिले जाणे ...............................५
९ .खातेदाराच्या निवासी दर्जात बदल ............................................... .........................५-६
१०. कर्जदाराच्या निवासी दर्जात झाल्यास कर्जे/ओव्हरड्राफ्टबाबत वागणूक.................................६
११. अनिवासी/निवासी नामनिर्देशिताला प्रदान.......................................................................६
१२. मुखत्यारनामा धारकाद्वारे एनआरओ खाते चालविले जाणे..................................................६
१३. अभ्यासासाठी विदेशात जाणाऱ्या व्यक्तीसाठी सुविधा........................................................७
१४. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड्स .......................................................................................७
१५. आयकर.............................................................................................................७
जोडपत्र-१ ..............................................................................................................८
रिझर्व बँकेला सादर करावयाचे विवरणपत्र/अहवाल...........................................................८
जोडपत्र-२ ..............................................................................................................९
प्राधिकृत डीलर बँकांसाठी कार्यकारी सूचना................................................................९-१०
परिशिष्ट..................................................................................................................११

## १. व्याख्या

### अनिवासी भारतीय (एनआरआय)

ह्याबाबत एनआरआयची व्याख्या दिनांक मे ३, २०००. फेमा अधिसूचना क्र.५ च्या विनियम २ मध्ये देण्यात आली आहे ह्या अधिसूचनेनुसार, एनआरआय म्हणजे, भारताचा नागरिक असलेली किंवा भारतीय वंशाची असलेली भारताबाहेर रहिवासी असलेली व्यक्ती.

### भारतीय वंशाची व्यक्ती (पीआयओ)

ह्या उद्देशाने, पीआयओची फेमा वरील अधिसूचने च्या विनियम २ मध्ये केलेली व्याख्या म्हणजे, बांग्लादेश व पाकिस्तान सोडून अन्य कोणत्याही देशाचा नागरिक असलेली अशी व्यक्ती की (अ) जिने कोणत्याही एक वेळी भारतीय पासपोर्ट धारण केला होता किंवा (ब) जी किंवा जिचे आई किंवा वडील, किंवा आजी किंवा आजोबा, भारतीय घटना किंवा नागरिकत्व अधिनियम १९५५ (१९५५ चा ५७) अनुसार भारताचे नागरिक होते किंवा (क) ती व्यक्ती भारतीय नागरिकाची किंवा वरील उपखंड (अ) किंवा (ब) मधील व्यक्तीची पत्नी किंवा पती आहे.

## २. पात्रता

(अ) भारताबाहेर रहिवासी कोणतीही व्यक्ती (फेमाच्या कलम २ अनुसार) फेमाच्या तरतुदी, नियम व विनियमांचे उल्लंघन व करणाऱ्या भारतीय रुपयांमधील खरे व्यवहार करण्यासाठी, एखाद्या प्राधिकृत डीलरकडे किंवा प्राधिकृत बँकेत एनआरओ खाते उघडू व चालवू शकतात.

(ब) बांग्लादेशाच्या/पाकिस्तानी राष्ट्रीयत्वाच्या/मालकीच्या व्यक्ती संस्थांद्वारे खाती उघडण्यासाठी रिझर्व बँकेची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे.

## ३. खात्याचे प्रकार

एनआरओ खाती, चालु, बचत, आवर्ती किंवा स्थिर ठेवी ह्या स्वरुपात उघडता व चालविता येऊ शकतात. अशा खात्यांना लागु असलेला व्याजदर आणि अशी खाती उघडणे, चालविणे व ठेवणे ह्याबाबत, रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेले निदेश/सूचना लागु होतील.

## ४. निवासी/अनिवासींसह संयुक्त खाती

ही खाती निवासी आणि/किंवा अनिवासींसह ठेवता येतील.

## ५. परवानगीप्राप्त क्रेडिट्स/डेबिट्स

### अ. क्रेडिट्स

(i) मुक्तपणे परिवर्तनीय असलेल्या विदेशी मुद्रेचे नेहमीच्या बँकिंग वाहिन्याद्वारे, भारताबाहेरुन केलेल्या प्रेषणाची रक्कम

(ii) खातेदाराच्या भारतामधील तात्पुरत्या वास्तव्यात त्याने जमा केलेली मुक्तपणे परिवर्तनीय असलेली विदेशी मुद्रा युएसडी ५००० डॉलर्स किंवा त्याच्या अधिक किंवा सममूल्य स्वरुपाची विदेशी मुद्रा चलन घोषणापत्रासह जमा केली जावी भारताबाहेरुन रुपये-निधी आणले गेले असल्यास त्यासाठी एनकॅशमेंट प्रमाणपत्र दिले जावे.

(iii) अनिवासी बँकांच्या रुपये खात्यांमधील हस्तांतरणे

(iv) खातेदाराची भारतामधील कायदेशीर येणे रक्कमा ह्यामध्ये, भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादींचा समावेश आहे.

(v) रुपये/विदेशी मुद्रेतून किंवा वारसा/ कायद्याने मिळविलेल्या अचल मालमत्तेसह इतर ॲसेट्सच्या विक्रीचे उत्पन्न

(vi) निवासी व्यक्ती, त्या निवासी व्यक्तीच्या जवळचा नातेवाईक असलेल्या व्यक्तीला (कंपन्या अधिनियम १९५६ च्या कलम ६ मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेला जवलचा नातेवाईक) एखाद्या एनआरआय/पीआयओला रुपयांच्या स्वरुपात असलेली देणगी क्रॉस्ड चेक/इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर व्दारा देऊ शकते. ही रक्कम, त्या एनआरआय/पीआयओच्या, अनिवासी(साधारण) रुपये (एनआरओ) खात्यात जमा केली जाईल आणि अशा देणगीच्या रकमेचे क्रेडिट हे (एनआरओ) खात्यात जमा करण्यास पात्र असल्याचे समजले जाईल. मात्र निवासी व्यक्ती साठी असलेल्या लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम (एलआर एस) खाली परवानगी असलेल्या, युएसडी २००,००० प्रति आर्थिक वर्ष ह्या मर्यादेच्या आत अशी रक्कम असली पाहिजे.

(vii) निवासी व्यक्ती, त्या निवासी व्यक्तीच्या जवळचा नातेवाईक असलेल्या व्यक्तीला (कंपन्या अधिनियम १९५६ च्या कलम ६ मध्ये व्याख्या केल्यानुसार असलेला जवलचा नातेवाईक) एखाद्या एनआरआय/पीआयओला रुपयांच्या स्वरुपात असलेले कर्ज क्रॉस्ड चेक/इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर व्दारा देऊ शकते. ही रक्कम, त्या एनआरआय/पीआयओच्या, अनिवासी(साधारण) रुपये (एनआरओ) खात्यात जमा केली जाईल आणि अशा कर्जाच्या रकमेचे क्रेडिट हे (एनआरओ) खात्यात जमा करण्यास पात्र असल्याचे समजले जाईल. मात्र निवासी व्यक्ती साठी असलेल्या लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम (एलआर एस) खाली परवानगी असलेल्या, युएसडी २००,००० प्रति आर्थिक वर्ष ह्या मर्यादेच्या आत अशी रक्कम असली पाहिजे.

**ब. डेबिट्स**

(i) रुपयांमधील सर्व स्थानिक प्रदाने, ह्यात भारतात केलेल्या गुंतवणुकीचाही समावेश आहे. मात्र त्यासाठी रिझर्व बँकेच्या विनियमांचे पालन असावे.

(ii) खातेदाराचे भारतामधील, भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादींसारख्या चालु उत्पन्नाचे भारताबाहेर प्रेषण

(iii) प्राधिकृत डीलर बँकेचे समाधान झाले असल्यास, सर्व खऱ्या कामांसाठी प्रति आर्थिक वर्षासाठि (एप्रिल-मार्च) युएसडी एक दशलक्ष पर्यंतचे प्रेषण

(iv) लागु असलेला कर भरला गेला असल्याच्या अटीवर, प्रति आर्थिक वर्षी युएसडी एक दशलक्ष डॉलर्स ह्या मर्यादेमध्ये, एनआरआयच्या एनआरई खात्यात हस्तांतरण.

**६. ॲसेट्सचे प्रेषण**

**६.१ भारतीय वंशाचा नसलेल्या विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तीद्वारे ॲसेट्सचे प्रेषण**

नेपाळ किंवा भूतानचा नागरिक नसलेली, किंवा भारतीय वंशाचा नसलेला (पीआयओ) परदेशी राज्यामधील रहिवासी जी भारतामधील नोकरीतून निवृत्त झाली आहे किंवा फेमाच्या कलम ६ च्या उपकलम (५) मध्ये संदर्भित व्यक्तीकडून मालमत्ता वारशाने मिळविलेली किंवा भारताबाहेर रहिवासी असलेली विधवा आहे व तिने तिच्या भारतात राहणाऱ्या मृत झालेल्या पतीची मालमत्ता मिळविली आहे, अशी

व्यक्ती, त्या खात्यातील शिल्लकेमधून प्रति आर्थिक वर्षात, युएसडी दहा लाखापेक्षा अधिक नसलेल्या रकमेचे प्रेषण करु शकते. त्यासोबत, त्या प्रेषणकर्त्याच्या प्राप्ति वारसा किंवा कायदेशीरपणा बद्दलचा कागदोपत्री पुरावा व सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ह्यांनी त्यांचे परिपत्रक क्र, १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात प्रेषणकर्त्याचे घोषणापत्र व चार्टर्ड अकाउंटंटने दिलेले प्रमाणपत्र जोडावे.

**६.२ एनआरआय/पीआयओद्वारे ॲसेट्सचे प्रेषण**

(अ) एनआरआय/पीआयओ, त्याच्या एनआरओ खात्याची शिल्लक/ॲसेट्सच्या त्याचे वारसा हक्काने/कायद्याने भारतात मिळविलेल्या ॲसेट्सच्या विक्रीचे उत्पन्न ह्यामधून, प्रति आर्थिक वर्षासाठी, युएसडी एक दशलक्षापेक्षा अधिक नसलेल्या रकमेचे प्रेषण करु शकतो. त्यासाठी प्रेषणकर्त्याच्या प्राप्ति वारसा किंवा कायदेशीरपणा बद्दलचा कागदोपत्री पुरावा व सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ह्यांनी त्यांचे परिपत्रक क्र, १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात प्रेषणकर्त्याचे घोषणापत्र व चार्टर्ड अकाउंटंटने दिलेले प्रमाणपत्र जोडावे.

(ब) वर दिलेल्या युएसडी दशलाखांच्या सर्वसमावेशक मर्यादेमध्ये एनआरआय/पीआयओ, त्याची आई किंवा वडील किंवा एखादा जवळचा नातेवाईक (कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम ६ मध्ये व्याख्या केलेला) ह्यांनी केलेल्या तडजोड कराराखाली मिळाळेल्या ॲसेट्सच्या विक्रीची रक्कम प्रेषित करु शकतो. ती तडजोड, तडजोडकर्त्याचा मृत्यु झाल्यावर लागु असावी व त्यासोबत तडजोड कराराची मूळ प्रत जोडली जावी व सोबत प्रेषणकर्त्याचे घोषणापत्र आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ह्यांनी त्यांचे परिपत्रक क्र. १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र जोडावे.

**६.३ रुपये निधीमधून भारतात मिळविलेले ॲसेट्स**

एनआरआय/पीआयओ, त्याने रहिवासी म्हणून विकत घेतलेल्या अचल मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न किंवा एनआरआय/पीआयओ म्हणून रुपये निधीमधून कोणत्याही लॉक-अप कालाशिवाय, वरील युएसडी दश लाखांच्या प्रति आर्थिक वर्षाच्या मर्यादेत प्रेषण करु शकतात.

**६.४ निर्बंध**

(अ) पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, चीन अफगाणिस्तान, इराण, नेपाळ व भूतान ह्यामधील नागरिकांना, अचल मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाच्या प्रेषणाची सुविधा उपलब्ध नाही.

फेमा १९९९ च्या कलम ६(५) अनुसार अचल मालमत्ता मिळविलेली व्यक्ती किंवा तिचा वारस, अशा मालमत्तेच्ता विक्रीच्या उत्पन्नाच्या रकमेचे प्रत्यावर्तन, रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय भारता बाहेर पाठवू शकणार नाही.

(ब) पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ व भूतानच्या नागरिकांना इतर वित्तीय ॲसेट्सच्या विक्रीच्या उत्पन्नाच्या प्रेषणाची सुविधा उपलब्ध नाही.

**७. भारताला भेट देणारे, भारतीय वंशाचे नसलेले विदेशी राष्ट्रीयत्वाचे लोक**

भारताला भेट देणारी, भारतीय वंशाची नसलेली विदेशी राष्ट्रीयत्वाची व्यक्ती, बँकिंग वाहिन्यामार्फत भारताबाहेरुन प्रेषण केलेल्या निधीचे किंवा त्याने भारतात आणलेल्या विदेशी मुदेची विक्री करुन, एनआरओ (चालु/बचत) खाते उघडू शकते. भारतामधून बाहेर जातेवेळी, प्राधिकृत डीलर बँकेद्वारा, त्या एनआरओ खात्यातील शिल्ल्क रकमेचे विदेशी मुद्रेत रुपांतरण केले जाऊ शकते. मात्र त्यासाठी, ते खाते किमान सहा महिने ठेवले गेले असले पाहिजे आणि त्याखात्यात त्या रकमेवरील उपवर्जित व्याज सोडून अन्य स्थानिक निधी जमा झाला

नसावा. ते खाते सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ ठेवले गेले असल्यास, संबंधित खातेदाराने, साध्या कागदावर, त्या शिल्लकेचे प्रत्यावर्तन करण्यासाठीचा अर्ज, रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे करणे आवश्यक आहे.

**८. खातेदार व तृतीय पक्षांना प्राधिकृत बँकेद्वारे कर्जे/ओव्हरड्राफ्ट दिले जाणे**

(अ) प्राधिकृत डीलर/बँकांद्वारे, अनिवासी खातेदार व तृतीय पक्षांना, स्थिर ठेवींच्या विरुध्द, पुढील अटींवर कर्जे दिली जाऊ शकतात :

(i) अशी कर्जे केवळ त्या कर्जदाराच्या वैय्यक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि/किंवा व्यापारासाठी दिली जातील. शेती/बागाईतीसाठी किंवा रियल इस्टेट किंवा पुनः कर्ज देण्यासाठी नव्हे.

(ii) रिझर्व बँकेने वळोवेळी ठरविलेले मार्जिन व व्याजदरासंबंधीच्या विनियमांचे पालन केले जाईल.

(iii) तृतीय पक्षांना अशी कर्जे/सुविधा देण्याबाबत, व्यापार/उद्योग ह्यांना दिल्या जाणाऱ्या अग्रिम राशींना लागु होणारे मापदंड व विचार लागु होतील.

(ब) प्राधिकृत डीलर/बँका, त्यांच्या व्यापारी निर्णयबुध्दीनुसार व व्याजदराच्या निदेशांचे अनुपालन ह्यावर अधारित खातेदराच्या खात्यात ओव्हरड्राफ्टची परवानगी देऊ शकतात.

**९. खातेदाराच्या निवासी दर्जात बदल**

**(अ) निवासीमधून अनिवासी**

(i) जेव्हा भारतात राहणारी एखादी व्यक्ती, नोकरीसाठी किंवा भारताबाहेर उद्योग किंवा धंदा करण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही हेतूने अनिश्चित कालासाठी भारताबाहेर राहण्याचा हेतू प्रकट करुन एखाद्या देशात (नेपाळ व भूतान सोडून) जाण्यासाठी भारताबाहेर जाते तेव्हा त्याचे विद्यमान खाते, अनिवासी (सर्वसाधारण) खाते समजले जावे. जेव्हा भारतात राहणारी एखादी व्यक्ती, नोकरीसाठी किंवा नेपाळ किंवा भूतानमध्ये, उद्योग किंवा धंदा करण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही हेतूने अनिश्चित कालासाठी नेपाळ किंवा भूतानमध्ये जाते तेव्हा त्याचे विद्यमान खाते, निवासी खाते म्हणूनच समजण्यात येत राहील. असे खाते, अनिवासी (सर्वसाधारण) खाते (एनआरओ) समजले जाऊ नये.

(ii) नोकरीसाठी भारतात येणाऱ्याव फेमा १९९९ च्या कलम २(५) खाली निवासी होणारे आणि निवासी बचत खाते उघडण्यास/ठेवण्यास पात्र असलेल्या विदेशी लोकांना, त्यांच्या भारतामध्ये ठेवलेल्या निवासी खात्याला, त्यांची कायदेशीर थकबाकी त्यांना मिळण्यास मदत व्हावी ह्यासाठी, त्यांची नोकरी संपल्यावर देश सोडल्यावर, एनआरओ खाते म्हणण्यास परवानगी आहे. मात्र त्यासाठी काही अटी आहेत.

**(ब) अनिवासीमधून निवासी**

नोकरीसह किंवा व्यवसाय धंदा करण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही हेतूसाठी, अनिश्चित कालासाठी भारतात राहण्याच्या उद्देशने खातेदार भारतात परत आल्यावर एनआरओ खात्याला निवासी रुपये खाते समजले जावे. जेथे खातेदार भारताच्या तात्पुरत्या भेटीसाठी आला असेल तेव्हा त्याच्या भेटीदरम्यान ते खाते अनिवासी समजले जावे.

**१०. कर्जदाराच्या निवासी दर्जात झाल्यास कर्जे/ओव्हरड्राफ्टबाबत वागणूक**

भारताचा रहिवासी असताना, कर्जे किंवा ओव्हरड्राफ्टची सुॅविधा असलेल्या आणि नंतर भारताबाहेर निवासी झालेल्या व्यक्तीबाबत, प्राधिकृत डीलर/बँक, तिला तसे वाटल्यास व निर्णयशक्तीवर आधारित त्या कर्ज/ओव्हरड्राफ्टसुविधा सुरुच ठेवू शकतात. अशा बाबतीत,

व्याजाचे प्रदान व कर्जाची परतफेड इनवर्ड रिमिटन्सने किंवा संबंधित व्यक्तीच्या भारतामधील कायदेशीर स्त्रोतांमधून करता येऊ शकते.

## ११. अनिवासी/निवासी नामनिर्देशिताला प्रदान

एखाद्या मृत झालेल्या खातेदाराच्या एनआरओ खात्यामधून अनिवासी नामनिर्देशिताला देय असलेली रक्कम, भारतामधील प्राधिकृत डीलर/बँकेमध्ये, त्या नामनिर्देशिताच्या एनआरओ खात्यात जमा केली जावी. मृत खातेदाराच्या एनआरओ खात्यातील, निवासी नामनिर्देशिताला देय असलेली रक्कम, त्या नामनिर्देशिताच्या भारतामधील बँकेतील निवासी खात्यात जमा केली जावी.

## १२. मुखत्यारनामा धारकाद्वारे एनआरओ खाते चालविले जाणे.

एखाद्या अनिवासी खातेदाराद्वारे, एखाद्या निवासी व्यक्तीला दिलेल्या मुखत्यारनाम्या मार्फत एनआरओ खात्यांचा व्यवहार चालवू देण्याबाबतचे अधिकार प्राधिकृत डीलर्स/बँकांना देण्यात आले आहेत. तथापि अशा व्यवहारांवर पुढील निर्बंध आहेतः

(i) रिझर्व बँकेने केलेल्या संबंधित विनियमांनुसार पात्र असलेल्या गुंतवणुकीसाठी असलेल्या प्रदानांसह रुपयांमधील सर्व स्थानिक प्रदाने; आणि

(ii) अनिवासी वैय्यक्तिक खातेदाराचे भारतामधील चालु उत्पन्न, नक्त लागुकर भरल्यावर भारताबाहेर प्रेषण

(iii) अनिवासी वैय्यक्तिक खातेदाराला द्यावयाचे निधी सोडल्यास, निवासी मुखत्यारनामा धारकाला, त्या खात्यात असलेल्या निधीचे भारताबाहेर प्रत्यावर्तन करण्यास किंवा त्या अनिवासी खातेधारकाच्या वतीने एखाद्या निवासी व्यक्तीला देणगी म्हणून देण्यास किंवा त्या खात्यातून दुसऱ्या एका एनआरओ खात्यात हस्तांतरित करण्यास परवानगी नाही.

## १३. अभ्यासासाठी विदेशात जाणाऱ्या व्यक्तीसाठी सुविधा

विदेशात अभ्यासासाठी जाणाऱ्या व्यक्तींना अनिवासी भारतीय (एनआरआय) समजले जाते आणि त्या एनआरआयना उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा मिळविण्यास पात्र आहते. फेमा विनियमांनुसार, त्यांनी, भारतातील रहिवासी म्हणून घेतलेली शैक्षणिक व इतर कर्जे त्यांना उपलब्ध होणे सुरुच राहील.

## १४. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड्स

प्राधिकृत डीलर बँकांना, रिझर्व बँकेची पूर्व मंजुरी घेतल्याशिवायही, एनआरआय/पीआयओंना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड देण्याची परवानगी आहे. अशा व्यवहारांची तडजोड इंटर्नल रेमिटन्सने किंवा त्या कार्डधारकाच्या एफसीएनआर(बी)/एनआरई/एनआरओ खात्यातून केली जावी.

## १५. आयकर

प्राधिकृत डीलर बँकांद्वारे, प्रेषणकर्त्याने घोषणापत्र दिल्यावर आणि सेंट्रलबोर्ड ऑफ टॅक्सेस, वित्तमंत्रालय, भारत सरकार ह्यांचे परिपत्रक क्र. १०/२००२ दि. ऑक्टोंबर ९, २००२ मध्ये (तुलना करा - ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक ५६ दि. नोंव्हेंबर २६) विहित केलेल्या नमुन्यात चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर केल्यावर प्रेषणे (लागु असलेले कर वजा करुन) करण्यास परवानगी दिली जाईल.

**जोडपत्र - १**

रिझर्व बँकेला सादर करावयाचे विवरणपत्र/अहवाल

| विवरणपत्राचा तपशील | वारंवारता | संबंधित सूचना |
|---|---|---|
| एनआरआय/पीआयओ आणि विदेशी व्यक्तींना दिलेल्या सुविधा - उदारीकरण - एनआरओ खात्यातून प्रेषण | तिमाही | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १२ दि नोव्हेंबर १६, २००६ |

**जोडपत्र - २**

<u>प्राधिकृत डीलर बँकांसाठी कार्यकारी सूचना</u>

**१. सर्वसाधारण**

प्राधिकृत डीलर बँकांनी, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (हा अधिनियम) खाली दिल्या गेलेल्या अधिनियम/विनियम/अधिसूचनांच्या तरतुदींच्या काळजीपूर्वक अभ्यास करावा.

निरनिराळ्या व्यवहारांसाठी प्रेषणाची परवानगी देतेवेळी प्राधिकृत डीलरने पडताळणी करावयाची कागदपत्रे रिझर्व बँक विहित करणार नाही.

ह्याबाबत प्राधिकृत बँकांनी ह्या अधिनियमाच्या कलम १० च्या उपकलम (५) चा संदर्भ घ्यावा. ह्या अधिनियमाच्या कलम १० च्या उपकलम (५) मधील तरतुदींनुसार, कोणत्याही व्यक्तीच्या वतीने विदेशी मुद्रेतील व्यवहार करतेवेळी, अशा व्यक्तीकडून (अर्जदार) प्राधिकृत डीलर बँकेने घोषणापत्र व अन्य माहिती घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याचे समाधान होईल की, तो व्यवहार ह्या अधिनियमाखाली दिलेल्या तरतुदींचे किंवा ह्या अधिनियमाखाली तयार केलेले कोणतेही नियम किंवा विनियम किंवा त्याखाली दिलेले निदेश किंवा आदेश ह्यांचे उल्लघन करणारा नाही, असे व्यवहार स्वीकारण्यापूर्वी प्राधिकृत डीलर बँकांनी, अर्जदाराकडून मिळविलेले कागदपत्र/माहिती, रिझर्व बँकेकडून पडताळणी करण्यासाठी जपून ठेवावी.

ज्याच्या वतीने व्यवहार स्वीकारला जात आहे अशी व्यक्ती, एखाद्या प्राधिकृत डीलर बँकेच्या आवश्यकतांचे समाधानकारक अनुपालन करण्यास नकार देत असल्यास त्याने तसा व्यवहार करण्याबाबतचा नकार लेखी दिला जावा. अशा नकार दिलेल्या व्यवहारात, ह्या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियमांचे किंवा त्याखाली दिलेल्या अधिसूचनांचे उल्लंघन करण्याचा हेतु होता असे समजण्यास प्राधिकृत डीलर बँकेकडे कारणे असल्यास ती बँक रिझर्व बँकेला तसे कळवील एकसमान कार्यकृती ठेवण्याच्या विचाराने, प्राधिकृत डीलर बँकांनी, ह्या अधिनियमच्या कलम १० च्या उपकलम (५) च्या तरतुदींचे पालन केल्याची खात्री करण्यासाठी, त्यांच्या शाखांच्या आवश्यकता व कागदपत्रे ह्यांचा विचार करावा.

**२. बांग्लादेश/पाकिस्तान येथील व्यक्ती/संस्थांद्वारे खाती उघडली जाणे**

बांग्लादेश/पाकिस्तानी राष्ट्रीयत्वाच्या/मालकीच्या व्यक्ती/संस्थांद्वारे खाटी उघडण्यासाठी रिझर्व बँकेची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे. अशा सर्व विनंत्या, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी मुद्रा विभाग (विदेशी गुंतवणुक विभाग) भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई-४००००१ ह्यांचेकडे संदर्भित करण्यात याव्यात.

**३. चालु उत्पन्नाचे प्रेषण**

खातेदाराच्या भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज इत्यादींसारख्या भारतामधील चालु उत्पन्नाचे भारताबाहेर करावयाचे प्रेषण एनआरओ खात्यात डेबिट करुन करण्यास परवानगी आहे.

भारतात एनआरओ खाते नसलेल्या एनआरआयचे, भाडे, लाभांश, पेन्शन, व्याज ह्यासारख्या चालु उत्पन्नाचे प्रेषण, प्राधिकृत डीलर बँका, प्रेषणासाठी प्रायोजित रक्कम ही प्रेषणासाठी पात्र असू त्यावरील योग्य, कर भरले गेले आहेत/तरतुद केली आहे असे, चार्टर्ड अकाउंटंटचे दिल्यावर करण्यास परवानगी देऊ शकतात.

**४. निर्बंध**

(अ) पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, चीन, अफगाणिस्तान, इराण, नेपाळ व भूतान येथील नागरिकांना अचल मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाच्या प्रेषणाची सुविधा उपलब्ध नाही.

(ब) इतर वित्तीय ॲसेट्सच्या विक्रीच्या उत्पन्नाचे ओरेषण करण्याची सुविधा, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ व भूतान येथील नागरिकांना उपलब्ध नाही.

**५. करांबाबत अनुपालन**

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, वित्तमंत्रालय, भारतसरकार ह्यांचे परिपत्रक क्र १०/२००२ दि ऑक्टोंबर ९/ २००२ [तुलना करा - ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५६ दि. नोव्हेंबर २६ २००२] ह्यात विहित केलेल्या नमुन्यांमध्ये, प्रेषणकर्त्याने दिलेले घोषणापत्र व चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र सादर केल्यावरच, प्राधिकृत डीलर (बँका अनिवासी व्यक्तींना) प्रेषणानी परवानगी देऊ शकतात.

परिशिष्ट

अनिवासी सर्वसाधारण रुपये (एनआरओ) खाते - ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचना परिपत्रकांची यादी

http://www.rbi.org.in/Scripts/BS_ApCircularsDisplay.aspx

http://www.rbi.org.in/Scripts/Bs_FemaNotifications.aspx

| अनु. क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | अधिसूचना क्र. फेमा ६२/२००२-आरबी | मे १३, २००२ |
| २. | अधिसूचना क्र. फेमा ९७/२००३-आरबी | जुलै ८, २००३ |
| ३. | अधिसूचना क्र. फेमा ११९/२००४-आरबी | जुन २९,२००४ |
| ४. | अधिसूचना क्र. फेमा १३३/२००५-आरबी | एप्रिल १, २००५ |
| ५. | अधिसूचना क्र. फेमा १५६/२००७-आरबी | जुन १३, २००७ |
| १. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.४५ | मे १४, २००२ |
| २. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१ | जुलै २, २००२ |
| ३. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.५ | जुलै १५, २००२ |
| ४. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१९ | सप्टेंबर १२, २००२ |
| ५. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२६ | सप्टेंबर २८, २००२ |
| ६. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२७ | सप्टेंबर २८, २००२ |
| ७. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.५६ | नोव्हेंबर २६, २००२ |
| ८. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.५९ | डिसेंबर९, २००२ |
| ९. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.६७ | जानेवारी १३, २००३ |
| १०. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.४३ | डिसेंबर८, २००३ |
| ११. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.४५ | डिसेंबर८, २००३ |
| १२. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.६२ | जानेवारी ३१, २००४ |
| १३. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.४३ | मे १३, २००५ |
| १४ | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१२ | नोव्हेंबर१६, २००६ |
| १५. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.६४ | मे २५, २००७ |
| १६. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.७० | जुन ०९, २०११ |
| १७. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१७ | सप्टेंबर १६, २०११ |
| १८. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१८ | सप्टेंबर १६, २०११ |
| १९. | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.११७ | मे ०७, २०१२ |

**सूचना/टीप**

- **प्राधिकृत डीलरांच्या सोयीसाठी, रिझर्व बँकेला सादर करावयाची विवरणपत्रे/अहवाल ह्यांचे कोष्टक आणि कार्यकारी मार्गदर्शक तत्वे अनुक्रमे जोडपत्र १ व २ मध्ये दिली आहेत.**
- **सर्व उपभोक्त्यांच्या माहितीसाठी स्पष्ट करण्यात येतेकी, हे माहापरिपत्रक परिपूर्व असेलच असे नाही आणि अधिक माहिती/स्पष्टीकरण पाहिजे असल्यास, संबंधित ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रकाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे.**

---------------------------------------------